**डॉ. दीपक हर्डीकर**
व्यवस्थापक

**कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**
दापोली ४१५ ७१२, जिल्हा रत्नागिरी (महाराष्ट्र), भारत

दूरध्वनी क्र. (कार्यालय) ०२३५८—२८०२३८ Fax : ०२३५८—२८०२३८; E-mail : atickkv@gmail.com

प्रसिद्धीसाठी बातमी

## क्रीडा क्षेत्रात करिअर केल्यास भवितव्य उज्वल

—एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण

दापोली १ : ''राष्ट्रीय पातळीवर खेळण्यास संधी मिळाल्यावर थांबू नका. कोणत्याही खेळात करिअर केल्यास स्वत:चा आगळा वेगळा ठसा उमटविता येतो व भवितव्यही उज्वल होते'' असे प्रतिपादन एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांनी येथे व्यक्त केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. तपस भट्टाचार्य हे होते.

व्यासपीठावर कुलगुरुंच्या मातोश्री ममता भट्टाचार्य, कुलगुरुंच्या सुविद्य पत्नी नंदिता भट्टाचार्य, विद्यापीठाचे शिक्षण संचालक आणि कुलसचिव डॉ. सतिश नारखेडे, संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर, मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरीचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. हुकुमसिंग ढाकर, क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. सुभाष चव्हाण, विद्यापीठ अभियंता राजेंद्र धुमाळ, नियंत्रक अनिल पवार, राज्यपाल निरिक्षण समितीचे समन्वयक डॉ. दीपक माने, मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे शारिरीक शिक्षण संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, छत्रपती पुरस्कार विजेते साहेबराव ठाकरे, कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आनंद नरंगळकर, उद्यानविद्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रमोद सावंत, वैद्यकीय अधिक्षक डॉ. बालाजी सगरे आदी प्रभृती उपस्थित होत्या.

श्री. सुरेंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, एका खेळाडूला राज्यस्तरीय स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्याचा बहुमान मिळाल्याने हा जीवनातील आनंदाचा क्षण आहे. स्पर्धेचे यशस्वी नियोजन केल्याबद्दल त्यांनी कुलगुरु डॉ. भट्टाचार्य यांचे अभिनंदन केले व खेळाडूंनी अखेरपर्यंत खिलाडूवृत्ती जोपासल्याबद्दल त्यांचेही कौतुक केले. ते म्हणाले की, स्पर्धेमध्ये योग्यवेळी अचूक निर्णय घेऊन त्याची त्वरीत अंमलबजावणी करणे फार महत्वाचे असते. खेळाडू हा सर्जनशिल असल्याने सापळयात अडकत नाही. स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेले मैदान 'जैसे थे' ठेवणे आव्हान असते. विद्यापीठ प्रशासनाने त्याकडे लक्ष घवे, अशी अपेक्षा त्यानी व्यक्त केली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. भट्टाचार्य म्हणाले की, मागील चार दिवस भारावलेले होते. विविध क्रीडा प्रकारात खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावून प्रतिस्पर्ध्यांशी स्पर्धा करताना खिलाडूवृत्ती जोपासली शिवाय विविध क्रीडा स्पर्धा बघताना त्यांच्यातील उर्जा, उत्साह बघून मन हरखून गेले. अहोरात्र मेहनत घेऊन क्रीडा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल त्यांनी सहकारी, संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक, पंच, क्रीडापटूंचे आभार मानले व क्रीडापटूंना उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची विद्यार्थीनी स्नेहा रामटेक, विद्यापीठाचा विद्यार्थी ओंकार मोनकार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचा विद्यार्थी सुशिल चव्हाण, अमरावती विद्यापीठाचे शारिरीक शिक्षण संचालक बाळासाहेब पोळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कबड्डी प्रशिक्षक शांताराम माळी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे डॉ. मुल्ला रुकमुळे, सुशिल इनामदार, डॉ. दीपक माने व डॉ. मनोज रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले.

स्वागतपर भाषणात डॉ. सुभाष चव्हाण यांनी क्रीडा स्पर्धेसाठी मानसिक व शारिरीक आरोग्य टिकवण्याची तसेच कठोर परिश्रम, शिस्त व गुरुंची गरज असल्याचे नमूद करीत सहकार्य करणाऱ्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण, वैद्यकीय अधिक्षक डॉ. बालाजी सगरे व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक रत्नागिरीचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन पवार यांचा कुलगुरुंच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाबद्दल डॉ. नितीन गोखले, डॉ. सुभाष चव्हाण व डॉ. प्रमोद सावंत यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुलगुरु डॉ. भट्टाचार्य यांनी क्रीडापटूंना शपथ दिली. तत्पूर्वी, १ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त क्रीडा महोत्सवात सामील झालेल्या २० विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी एड्स जनजागरण रॅली काढून पथसंचलन केले. विजय क्रीडा संकुलातून निघालेली रॅली केळसकर नाका, बाजारपेठ, बुरोंडी नाकामार्गे पुन्हा क्रीडांगणावर आली. पथसंचालनात क्रीडापटूंनी एड्स जनजागरणासाठी चित्ररथ, विविध घोषवाक्य लिहिलेली फलके धरुन पथसंचलन केले. अर्थपूर्ण विविध घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता. जाणत्या व्यक्तिंनी सदर उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करीत प्रशंसा केली. सदर रॅलीमध्ये उपजिल्हा रुग्णालय, दापोलीचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. बालाजी सगरे, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक रत्नागिरीचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन पवार, जिल्हा पर्यवेक्षक सचिन पाटील, समुपदेशक पांडुरंग हुबाळे, विलास म्हस्के, विजय पवार, प्रथमेश चाफेकर, राजेश शिर्के, वैद्यकीय पथकात डॉ. प्रदीप बन्सोड, डॉ. सीमा शिरसाठी, भक्ती भारदे, विद्यापीठाचे डॉ. एम.एस. माने, डॉ. आवारे, डॉ. मर्दाने, डॉ. देसाई, डॉ. अरुण माने इ.चा प्रामुख्याने समावेश होता.

कार्यक्रमाच्या अखेरीस कुलगुरु डॉ. तपस भट्टाचार्य यांनी विद्यापीठाचा तर एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांनी क्रीडा महोत्सवाचा ध्वज उतरविला. डॉ. भट्टाचार्य यांनी क्रीडा महोत्सव २०१८ च्या क्रीडा महोत्सवाचे आयोजक मुंबई विद्यापीठाचे डॉ. सुनिल पाटील व डॉ. आर. एम. सुरडकर यांच्याकडे सन्मानाने सुपूर्द केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन गोखले यांनी केले. आभार नितीन वागळे यांनी मानले.

सही/—
(दीपक हर्डीकर)

**डॉ. दीपक हर्डीकर**
**व्यवस्थापक**

**कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**
दापोली ४१५ ७१२, जिल्हा रत्नागिरी (महाराष्ट्र), भारत

दूरध्वनी क्र. (कार्यालय) ०२३५८—२८०२३८ Fax : ०२३५८—२८०२३८; E-mail : atickkv@gmail.com

प्रसिद्धीसाठी बातमी

**क्रीडा महोत्सव २०१७ चे विजेतेपद मुंबई विद्यापीठाकडे तर उपविजेतेपद पुणे विद्यापीठाकडे**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा — क्रीडा महोत्सव—२०१७ चे प्रमुख विजेपद मुंबई विद्यापीठ, मुंबई ने पटकावले तर उपविजेतेपदाचे मानकरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ठरले. कुलगुरु डॉ. तपस भट्टाचार्य व एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठाला शंकरभाई रघुनाथराव दलवाई फिरते चषक व ट्रॉफी तसेच उपविजेत्या पदाचे फिरते चषक व ट्रॉफी पुणे विद्यापीठाला जल्लोशपूर्ण वातावरणात व दिमाखदार सोहळयात प्रदान करण्यात आली.

कबड्डी (पुरुष) गटात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबई द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तृतीय क्रमांकाने सन्मानीत करण्यात आले.

कबड्डी (महिला) गटात मुंबई विद्यापीठ, मुंबई प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे द्वितीय तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीला तृतीय क्रमांकाने सन्मानीत करण्यात आले.

खोखो (पुरुष) सामन्यात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडला प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबईला द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला तृतीय पुरस्कार देण्यात आला.

खोखो (महिला) सामन्यात मुंबई विद्यापीठ, मुंबईला प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला द्वितीय तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीला तृतीय पुरस्कार देण्यात आला.

व्हॉलीबॉल (महिला) गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला प्रथम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरला द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरला तृतीय पुरस्कार प्रदान करण्यत आला.

बास्केटबॉल (महिला) सामन्यात मुंबई विद्यापीठ, मुंबईला प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरला तृतीय क्रमांक मिळाला.

बास्केटबॉल (पुरुष) सामन्यात मुंबई विद्यापीठ, मुंबईला प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला द्वितीय तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादला तृतीय क्रमांक मिळाला.

एड्स रॅली उत्कृष्ठरित्या प्रदर्शित केलेल्या संघाचा प्रथम पुरस्कार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना देण्यात आला. उत्कृष्ठ शिस्तपालन संघाचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांना देण्यात आला. उत्कृष्ठ पथसंचलनाचा पुरस्कार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीला देण्यात आला.

सांघिक (पुरुष) खेळाचे सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठ, मुंबईला तर सांघिक (महिला) खेळाचे सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठ, मुंबईला देऊन सन्मानित करण्यात आले.

मार्ग व मैदानी (पुरुष) खेळाचे सर्वसाधारण विजेतेपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला तर महिलांचे सर्वसाधारण विजेतेपद शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरला देऊन सन्मानित करण्यात आले.

उत्कृष्ठ ॲथलेटीक (पुरुष) म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेचा शशांक शिंदे ला तर उत्कृष्ठ ॲथलेटीक (महिला) म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या चैत्राली गुजर हिला सन्मानित करण्यात आले.

थाळीफेक (पुरुष) मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या कीर्तीकुमार बेनके याने प्रथम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचा प्रमोद काळे याने द्वितीय तर मुंबई विद्यापीठ, मुंबईचा तेजस डोंगरे याने तृतीय क्रमांक मिळवला.

४ बाय ४०० मीटर्स टप्पा शर्यत (महिला) मध्ये मुंबई विद्यापीठ, मुंबईने प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेने द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने तृतीय क्रमांक मिळवला.

लांबउडी (महिला) मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या चैत्राली गुजर हिने प्रथम, त्याच विद्यापीठाच्या प्रगती संकपाळ हिने द्वितीय तर मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या श्वेता ठाकूर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

४ बाय ४०० मीटर्स टप्पा शर्यत (पुरुष) मध्ये मुंबई विद्यापीठ, मुंबईने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेने तृतीय क्रमांक मिळवला.

सही/—
(दीपक हर्डीकर)